पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काजळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७५। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार २१/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# संगमनेर तालुक्यासाठी ३५० मे. टन युरिया मंजूर

## काँग्रेसमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा; तर दुसरीकडे शेतकऱ्यांचे आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - खरीप हंगामात युरिया खताच्या टंचाईमुळे अडचणीत सापडलेल्या संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. राज्याचे माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुका काँग्रेस कमिटीने केलेल्या आंदोलनानंतर शासनाने दखल घेत बफर स्टॉकमधून ३४९.५२ मे.टन (सुमारे ३५० मे.टन) युरिया उपलब्ध करून दिला आहे. हा साठा तालुक्यातील कृषी विक्रेत्यांकडे वितरित करण्यात आला असून लवकरच शेतकऱ्यांना युरिया उपलब्ध होणार आहे.

सध्या तालुक्यात खरीप हंगाम सुरू असून मका, सोयाबीन, बाजरीसह विविध पिकांची मोठ्या प्रमाणावर पेरणी झाली आहे. काही भागांत पेरणी अद्याप सुरू आहे. या पिकांसाठी युरिया अत्यावश्यक असल्याने शेतकऱ्यांकडून सातत्याने खताची मागणी होत होती. मात्र पुरेसा साठा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता.

या पार्श्वभूमीवर १४ जुलै २०२६ रोजी संगमनेर तालुका काँग्रेस कमिटी व तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी एकत्र येत उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांकडे शासनाच्या ताब्यातील बफर स्टॉकमधून तातडीने युरिया उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यावेळी कृषी अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच युरिया उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते.

या मागणीची पूर्तता करत खरीप हंगाम २०२६-२७ साठी उपलब्ध संरक्षित (पान ३)

### माजी मंत्री थोरात यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना सुविधा सहज मिळत होत्या

**महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना युरियासह विविध कृषी सुविधा आणि शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळत होता. मात्र मागील दोन वर्षांपासून संगमनेर तालुक्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. काँग्रेसच्या आंदोलनामुळे काही प्रमाणात युरिया उपलब्ध झाल्याने दिलासा मिळाला असला तरी पुढील काळात तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याला आवश्यक तेवढा युरिया विनाअडथळा उपलब्ध करून द्यावा अशी मागणी वाघापूर येथील शेतकरी नामदेव शिंदे यांनी केली.**



**येथील शेतकी संघात मोठ्या प्रमाणावर युरिया उपलब्ध असताना तो शेतकऱ्यांना दिला जात नाही अशा गैरसमजातून काही शेतकऱ्यांनी नाशिक पुणे महामार्गावर अचानक रास्ता रोको आंदोलन सुरू केले. वास्तविक शासनाच्यावतीने याठिकाणी जवळपास एक हजार गोणी युरिया खत पुरवठा करण्यात आला होता. परंतु यातील केवळ ३६० गोण्या युरिया हा शेतकी संघाचा तर उर्वरित युरिया हा इतर कृषी सेवा केंद्रांना वितरित करण्यात येणार होता. त्यानुसार ३६० गोण्या वितरित झाल्यावर उर्वरित शेतकऱ्यांनी गोंधळ घातला. शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केल्याने तालुका कृषी अधिकाऱ्यांनी तातडीने याठिकाणी धाव घेतली. त्यांनी वरीष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून याच ठिकाणी उर्वरित शेतकऱ्यांना युरिया वाटपास परवानगी देण्यात आली. त्यानंतर शेतकी संघाने टोकण वाटून उर्वरित शेतकऱ्यांना खत वाटप करण्यात आले. यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी मध्यस्ती केल्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले.**

# दिल्लीत आंदोलन सुरूच

## दोषींवर कारवाई करणार - पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

कॉकरोच जनता पार्टीच्या जंतर-मंतर येथील आंदोलनावर सोमवारी पोलिसांनी प्रचंड बळाचा वापर करून आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. अनेक विद्यार्थ्यांना प्रचंड मारहाण करण्यात आली. यात अनेक जण जखमी झाले. परंतु सीजेपी अध्यक्ष अभिजीत दिपके याने माघार न घेता हे आंदोलन सुरूच ठेवले. तर सोनम वांगचूक यांनी देखील आपले उपोषण सुरू ठेवले आहे. आज मंगळवारी या आंदोलनाचा २४ वा दिवस आहे.

दरम्यान, आज मंगळवारी सकाळी सुरक्षेच्या व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठी पोलीस तिथे पोहोचले असता, उगझ च्या समर्थकांनी प्रशासनाचा निषेध करत घोषणाबाजी केली. मोर्चानंतर दिल्ली पोलिसांनी सोमवारी उशिरा जंतर-मंतर परिसर रिकामा केला होता (पान ५)



# हिवरगावपावसा येथील टोल वसुली बंद करा

## राष्ट्रवादी काँग्रेसचे आमरण उपोषण - आंदोलन सुरू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपूर्ण व निकृष्ट कामामुळे वाहनधारकांचे जीव धोक्यात आले आहेत. महामार्गाचे काम, सर्व्हिस रोड, बोगद्यांतील सुरक्षा उपाययोजना, स्ट्रीट लाईटची कामे पूर्ण करावे तसेच ज्या लोकांचे टोल पास असून देखील त्यांच्याकडून टोल वसुली करण्यात येत आहे. ही टोल वसुली तात्काळ बंद करावी, या मागण्यांसाठी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांच्या नेतृत्वाखाली सोमवार २० जुलै रोजी टोलनाका कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शहराध्यक्ष प्रवीण कानवडे व विद्यार्थी काँग्रेस तालुकाध्यक्ष गजानन भोसले यांनी आमरण उपोषण आंदोलन सुरू केले आहे. यावेळी टोल नाका प्रशासन विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू असले, तरी संगमनेर तालुक्यात बोटा ते कऱ्हे घाट पट्ट्यात वाहनधारकांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागतो. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. मात्र संबंधित कंत्राटदार कंपनीने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

(पान २ वर)

# अजित डोवाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

पुणे (वृत्तसंस्था)

देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल यांना यंदाचा प्रतिष्ठेचा अजित डोवाल 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' जाहीर झाला आहे. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टतर्फे हा पुरस्कार दिला जातो. लोकमान्यांच्या १०६ व्या पुण्यतिथीला शनिवारी (ता. १ ऑगस्ट ) पुण्यात हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुरस्कार वितरण सोहळ्यास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

देशाच्या सुरक्षा व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणारे दोवाल यांनी 'ऑपरेशन सिंदूर', बालाकोट हवाई हल्ला, डोकलाममधील राजनैतिक वाटाघाटी यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाच्या सुरक्षा व्यवस्थेची धोरणे आणि भूमिका मांडण्यात डोवाल यांचे धोरण मोलाचे ठरले आहे. गुप्तचर विभागाचे त्यांनी एका दशकाहून अधिक काळ नेतृत्व केले. त्यांनी इस्लामाबाद आणि



लंडन येथील भारतीय उच्चायुक्तालयात राजनैतिक पदे भूषवली आहेत. दहशतवादविरोधी कारवाया, गुप्तचर मोहिमांतील आणि त्याद्वारे देशाला सामर्थ्यवान करण्याच्या राष्ट्रकार्यासाठी त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली.

ADVANCE GOLD -SIP- SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
नियम व अटी लागू.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
30 ते 70% डिस्काउंट सेल
आला रे आला राजपाल सेल आला..!
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# मुंबईत किसान सभेचा भव्य मोर्चा

## शेतकरी प्रश्नांसह भारत-अमेरिका व्यापार करारालाही विरोध



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अखिल भारतीय किसान सभा महाराष्ट्र राज्य समितीच्या वतीने सोमवारी (२१ जुलै) मुंबईतील आझाद मैदानावर राज्यभरातील हजारो शेतकऱ्यांचा भव्य राज्यस्तरीय मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. राज्यातील विविध प्रलंबित शेतकरी प्रश्नांसह केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात हा मोर्चा काढण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा निर्धार किसान सभेने व्यक्त केला आहे.

या मोर्चातून राज्य सरकारच्या त्रुटीपूर्ण कर्जमाफी योजनेचा निषेध करण्यात येणार असून, देवस्थान ट्रस्ट, तळघर व गायरान जमिनींवरील शेतकऱ्यांना मालकी हक्क, पीक विमा नुकसानभरपाई, तसेच इतर प्रलंबित कृषी प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली जाणार आहे.

याशिवाय दिल्लीतील विद्यार्थी-युवकांच्या आंदोलनाशी एकजूट व्यक्त करत त्या आंदोलनावर झालेल्या कथित दडपशाहीचा निषेध करण्यात येणार आहे. अखिल भारतीय किसान सभा आणि संयुक्त किसान मोर्चा यांच्या राष्ट्रीय आवाहनानुसार भारत-अमेरिका यांच्यात प्रस्तावित व्यापार करारालाही या मोर्चातून विरोध दर्शविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

मोर्चाचे नेतृत्व अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, माजी आमदार जे. पी. गावीत, राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले, राज्याध्यक्ष उमेश देशमुख, सीटूचे राज्य सचिव तथा आमदार विनोद निकोले यांच्यासह किसान सभेचे प्रमुख पदाधिकारी करणार आहेत.

दरम्यान, सुप्रसिद्ध पत्रकार आणि पीपल्स आर्काइव्ह ऑफ रूरल इंडियाचे संस्थापक-संपादक पी. साईनाथ हे शेतकरी मेळाव्याला मार्गदर्शन करणार आहेत.

मोर्चानंतर किसान सभेचे शिष्टमंडळ मंत्रालयात संबंधित मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर करणार असून, त्यावर सविस्तर चर्चा करण्याची मागणी करणार आहे. किसान सभेच्या या राज्यव्यापी आंदोलनाकडे राज्यातील शेतकरी आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# वारीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## विजया ॲग्रोकडून सलग तिसऱ्या वर्षी कडुनिंब बियांचे मोफत वाटप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संतांच्या वारीतून अध्यात्माबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्याचा अनोखा उपक्रम विजया ॲग्रो इंडस्ट्रीजने सलग तिसऱ्या वर्षी राबविला आहे. 'कडुनिंब संवर्धन यात्रा' या उपक्रमांतर्गत कोल्हार येथील ज्ञानेश्वरी सेवा मंडळामार्फत वारकऱ्यांना विशेष तयार करण्यात आलेल्या कडुनिंब बियांच्या पॅकेटचे मोफत वितरण करण्यात आले.

पंढरपूरच्या दिशेने पायी प्रवास करणारे वारकरी वाटेत जिथे मोकळी जागा दिसेल, त्या ठिकाणी कडुनिंबाच्या बियांचे बीजारोपण करत आहेत. त्यामुळे वारीचा मार्ग भविष्यात हिरवागार करण्याचा आणि पर्यावरण संवर्धनात प्रत्येक वारकऱ्याचा सहभाग वाढविण्याचा हा अभिनव प्रयत्न ठरत आहे.

विजया ॲग्रोच्या या उपक्रमामुळे मोठ्या प्रमाणावर कडुनिंबाची झाडे उभी राहण्यास मदत होणार असून, भविष्यात ही झाडे वारकरी, शेतकरी आणि प्रवाशांना सावली, शुद्ध हवा आणि नैसर्गिक आधार देतील. आज लावलेले कडुनिंबाचे बी उद्या एखाद्या वारकऱ्याला विसावा आणि सावली देईल, या





भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले.

कडुनिंब हा औषधी गुणधर्मांनी समृद्ध वृक्ष असून हवा शुद्ध ठेवणे, तापमान नियंत्रण, प्रदूषण कमी करणे आणि जैवविविधतेचे संवर्धन यामध्ये त्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचा विजया ॲग्रोचा प्रयत्न कौतुकास्पद मानला जात आहे. यापुढील काळात 'एक वारकरी - एक कडुनिंब' हा संकल्प अधिक व्यापक करण्याचा निर्धार विजया ॲग्रोने व्यक्त केला आहे. वारीमध्ये सहभागी होणाऱ्या दिंड्यांना कडुनिंबाच्या बिया मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असून इच्छुकांनी ९९२२९१३५३२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पान १ वरून - हिवरगावपावसा येथील...

महामार्गावर अनेक ठिकाणी दिशादर्शक फलक, चेतावणी फलक, रिफ्लेक्टर्स, ब्लिंकर्स आणि बॅरिकेडिंगचा अभाव असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. कऱ्हेघाट परिसरात स्ट्रीट लाईट नसल्याने रात्रीच्या वेळी अपघातांचा धोका वाढला आहे. बोगद्यांमध्ये पावसाळ्यात पाणी साचत असून तेथे पुरेशा प्रकाशव्यवस्थेचा अभाव असल्याने

वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसने महामार्गाच्या कामाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे रस्त्यावर तडे गेले असून ठिकठिकाणी निर्माण झालेले चढ-उतार अपघातांना कारणीभूत ठरत असल्याचा दावा केला आहे. स्टेटस हॉटेलजवळील पूल आणि रायतेवाडी फाटा येथील पुलाचे काम संथ गतीने सुरू असून पर्यायी मार्ग नसल्याने वाहतूक कोंडी होत असून वाहनधारकांचा वेळ आणि इंधन वाया जातो. गेल्या काही महिन्यांत या महामार्गावर झालेल्या विविध अपघातांत ५० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला. शेकडो जखमी वा कायमस्वरूपी अपंग झाले. हे अपघात चालकांच्या निष्काळजीपणामुळे नसून, कंत्राटदार कंपनीने आवश्यक सुरक्षा उपाययोजना न केल्याने झाल्याचा आरोप करीत संबंधित कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिवाय मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, अपंग झालेल्या नागरिकांच्या उपचाराचा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करावा, संबंधित कंपनीचे कंत्राट रद्द करून तिला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकावे, तसेच महामार्गाच्या कामाचे आयआयटी किंवा तत्सम स्वायत्त संस्थेमार्फत 'थर्ड पार्टी क्वालिटी अँड सेफ्टी ऑडिट' करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी पुढील २४ तासांत सर्व आवश्यक सुरक्षा फलक, रिफ्लेक्टर्स, ब्लिंकर्स आणि बॅरिकेडिंगची व्यवस्था करण्याचे आदेश राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला द्यावेत, तसेच संगमनेर तालुक्यातील अनेकांचे टोल पास काढण्यात आले आहेत. तरी सुद्धा टोल नाका चालकांकडून टोल पास धारकांना टोल कट झाल्याचे मेसेज येत आहेत. हे त्वरित बंद करण्यात यावे अशीही मागणी करण्यात आली आहे. अशा विविध मागण्यांसाठी सोमवार २० जुलैपासून हिवरगाव पावसा येथील टोलनाका कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष कपिल पवार, शहराध्यक्ष प्रवीण कानवडे, महिला जिल्हाध्यक्ष वैशाली राऊत, गजानन भोसले, संतोष भुजबळ, दिनेश डफेदार, अशोक काळे, भाऊ गोरे, गौरव वाळे, भाऊ म्हस्के, अमोल मस्के, सरलाताई भुजबळ, रईस पठाण, नितीन अहिरे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# संगमनेरवरील सर्व विघ्न दूर करा - आ. खताळ

## संगमनेरला सर्वात उंच गणेशमूर्तीच्या आगमनाचे स्वागत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेरवरील सर्व विघ्न गणपती बाप्पा दूर करा आणि तालुक्यामध्ये भरपूर पाऊस पडू दे आणि बळीराजा सुखी-समाधानी होवून सर्वांना सुख समृद्धी आणि आरोग्य लाभू दे, अशी प्रार्थना आमदार अमोल खताळ यांनी गणरायाच्या चरणी करून सर्वात उंच १४ फुटी गणेश मूर्तीच्या आगमनाचे स्वागत केले.

मुंबईतील लालबाग परळ येथून लालबाग राजाच्या गणेशमूर्तींपैकी सर्वात उंच असलेली १४ फुटी गणेश मूर्तीच्या आगमनाचा अहिल्यानगर जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात संगमनेरकरांना पहिल्यांदा मिळाला आहे त्यामुळे संगमनेरकरांत आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले आहे . शहरातील विद्यानगरच्या विघ्नहर्ता गणेश तरुण मित्रमंडळाच्या सहा ते सात कार्यकर्त्यांनी एकत्रित येत कुणाकडूनही एक रुपया न घेता स्वतः स्वखर्चातून ही लालबागच्या राजाची गणेशमूर्ती खरेदी केली आहे या सर्व तरुणांनी लहानपणापासून पाहिलेले स्वप्न मुंबईहून संगमनेरात लालबाग राजाची गणेश मूर्ती आणून सत्यात उतरवले आहे

मुंबईतील प्रसिद्ध मूर्तिकार प्रथमेश घाडगे यांनी ही १४ फुटी आकर्षक गणेशमूर्ती साकारली आहे. रविवारी दुपारी तीन वाजता ही मूर्ती विशेष कंटेनरमधून मुंबईतील लालबाग परळ येथून संगमनेरकडे रवाना झाली. यावेळी मुंबईतील गणेश भक्तांनी गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात मुंबई-ठाणे मार्गे समृद्धी महामार्ग आणि पुणे-नाशिक राष्ट्रीय महा मार्गाने प्रवास करत सोमवारी सकाळी ही भव्य गणेशमूर्ती संगमनेर शहरात आगमन झाले स्वागतासाठी मार्गावर विविध ठिकाणी नागरिकांनी मोठी गर्दी



केली होती. गणपती बप्पा मोरयाचा जयघोषात करत संगमनेर करांनी या लालबागच्या राजाच्या गणपतीचे भक्तीमय वातावरणात स्वागत केले.

बसस्थानक परिसरात या सर्वात उंच गणेश मूर्तीचे आगमन झाल्या नंतर आमदार खताळ व मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते गणरायाचे पूजन करून महाआरती करण्यात आली. या प्रसंगी विघ्नहर्ता गणेश तरुण मित्रमंडळाचे अध्यक्ष साहिल कर्पे, उपाध्यक्ष अक्षय दुर्गुडे, श्लोक बिल्लाडे समर्थ कटारिया , विशाल जोशी, नमन कानकाटे, ओम दिनकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने गणेशभक्त उपस्थित होते.

**लहानपणापासून मुंबईतील भव्य गणेश मूर्ती पाहताना एक दिवस अशीच सर्वात उंच मूर्ती आपल्या संगमनेरात आणायची, असा संकल्प मनात केला होता. मंडळातील सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे यंदा तो संकल्प पूर्ण झाला. १४ फुटी भव्य गणरायाचे संगमनेरात आगमन झाल्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. हे आमच्या मंडळासाठी व संपूर्ण संगमनेरकरांसाठी अविस्मरणीय क्षण असल्याचे विघ्नहर्ता गणेश मंडळाचे अध्यक्ष साहिल कर्पे यांनी सांगितले.**

# हेचि दान देगा देवा... तुझा विसर न व्हावा !

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा।।
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी।।
न लगे मुक्ती धनसंपदा । संत संग देई सदा।।
तुका म्हणे गर्भवासी । सुख घालावे आम्हासी।।

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा हा अभंग म्हणजे भक्ती, निस्वार्थता आणि ईश्वरप्रेम यांचा सर्वोच्च आविष्कार आहे. विशेष म्हणजे तुकाराम महाराजांनी हे दान स्वतःसाठी मागितलेले नाही. कारण ते स्वतः कधीच विठ्ठलाला विसरले नव्हते. त्यांनी ही प्रार्थना आपल्या सर्वांसाठी केली आहे. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात देवस्मरण अखंड राहावे, हीच त्यामागची व्यापक भावना आहे. आपण देवाकडे मागतो तेव्हा आपल्या मागण्यांमध्ये बहुतांश वेळा स्वार्थ असतो. सुख, संपत्ती, सत्ता, यश, आरोग्य, प्रतिष्ठा अशा अनेक इच्छा आपण देवासमोर मांडतो. परंतु संतांच्या मागण्यात स्वार्थ नसतो; त्यात विश्वकल्याणाची भावना असते. तुकाराम महाराजांच्या या अभंगात भव्यता आहे, दिव्यता आहे, तेजस्वी विचार आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे परमेश्वराबद्दलची कृतज्ञता आहे.

माणसाकडे सत्ता, संपत्ती, वैभव आणि बुद्धिमत्ता आली की अनेकदा तो देवाला विसरतो. देव आहे कुठे? असा प्रश्न विचारू लागतो. अशा लोकांनी एकदा पंढरीच्या वारीचे दर्शन घ्यावे. लाखो वारकऱ्यांच्या ओठांवरचा नामघोष, त्यांच्या डोळ्यांतील भक्तिभाव आणि विठ्ठलासाठीची अखंड तळमळ पाहिली की देवाचे अस्तित्व अनुभवायला मिळते. मात्र विठ्ठलाचे दर्शन डोळ्यांनी नव्हे, तर भक्तीच्या दृष्टीने घ्यावे लागते. ज्यांच्या अंतःकरणावर अहंकार, वासना आणि स्वार्थाचा मोतीबिंदू चढला आहे, त्यांना विठ्ठल कसा दिसणार? पांडुरंगशास्त्री आठवले यांनी या अभंगाचे अत्यंत मार्मिक विश्लेषण केले आहे. ते म्हणतात, आपण देवाकडे जे मागतो, त्यामध्ये स्वार्थ असतो; पण संत जे मागतात त्यामध्ये निस्वार्थ भाव असतो. ते स्वतःसाठी काहीही मागत नाहीत, तर संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी प्रार्थना



करतात. याचे एक सुंदर उदाहरण सांगितले जाते. एका घरातील दोन मुलींची लग्ने झाली. एक मुलगी शेतकरी कुटुंबात गेली, तर दुसरी कुंभाराच्या घरी. शेतकरी मुलगी देवाला प्रार्थना करू लागली, देवा, आता भरपूर पाऊस पडू दे. कारण तिची पेरणी झालेली होती. दुसरीकडे कुंभाराची मुलगी म्हणाली, देवा, अजून काही दिवस पाऊस पडू नको; माझ्या मडक्यांची भट्टी सुरू आहे. आता देवाने कोणाची प्रार्थना ऐकावी? प्रत्येकाची गरज खरी, पण प्रत्येकामागे स्वतःचा स्वार्थ दडलेला.

म्हणूनच म्हणतात, न मागताही जो देतो तो देव; आणि मागितल्यानंतर देईलच याची खात्री नसते, तोही देवच. आपण काहीही न मागता देवाने आपल्याला मनुष्यजन्म दिला, विचार करण्याची बुद्धी दिली, सुंदर शरीर दिले. ही त्याचीच कृपा आहे. संत नामदेव म्हणतात -

जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले, तेव्हा या विठ्ठले कृपा केली. ही कृपा आपल्यावर आहे, म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात - हेच दान दे देवा... तुझा विसर कधीच पडू देऊ नको. तुकाराम महाराज आणि विठ्ठल हे एकरूप झाले होते. म्हणूनच ते म्हणतात, मला मुक्तीही नको. कारण मुक्ती मिळाली तर भक्तीचा आनंदच संपेल. विठ्ठलाचे नाम, त्याचे रूप, त्याचे गुणगान आणि संतांचा सहवास यांतच त्यांना परमसुख वाटत होते. म्हणून ते म्हणतात - संत संग देई सदा.

संतांचा सहवास म्हणजेच जीवनाचा खरा उत्सव. त्या संगतीत मन शुद्ध होते, विचार निर्मळ होतात आणि भक्ती अधिक दृढ होते. म्हणूनच ते जन्मोजन्मी गर्भवास सोसण्यासही तयार आहेत; पण विठ्ठलाच्या सगुण भक्तीपासून दूर जायचे नाही. आज लाखो वारकरी पंढरीच्या वारीत सहभागी होऊन याच सगुण भक्तीचा आनंद अनुभवत आहेत. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर, दिंड्यांचा उत्साह आणि विठ्ठलनामात रंगून गेलेले लाखो भाविक हे दृश्य म्हणजे संत तुकारामांच्या विचारांचे सजीव रूप आहे. त्या भक्तांच्या मांदियाळीत जात, धर्म, श्रीमंती, गरिबी, उच्च-नीच असा कोणताही भेद राहत नाही. सर्वजण विठ्ठलाचे होऊन जातात. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांमधून जगण्याचा अत्यंत सोपा आणि सुंदर मार्ग दाखविला. त्यांच्या अभंगांनी जीवनाचे भान दिले, संतसंगाची गोडी लावली आणि भक्तीचे खरे महत्त्व समजावून सांगितले. हरिभक्तपरायण मामासाहेब दांडेकर म्हणायचे, श्वास हाच विठ्ठल आणि विठ्ठल हाच श्वास. आपण जसा श्वास घ्यायला कधी विसरत नाही, तसाच विठ्ठलाचाही विसर पडता कामा नये. म्हणूनच संत तुकाराम महाराजांची ही प्रार्थना आजही प्रत्येकाच्या जीवनाचा मंत्र ठरते-

हेचि दान देगा देवा... तुझा विसर न व्हावा!

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# शेतकऱ्यांना मोठा दिलासा !

## कर्जमाफीच्या पहिल्या यादीची होणार घोषणा

मुंबई (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मोठी अपडेट समोर आली आहे. राज्यात ३० जुलैच्या आत कर्जमाफी मिळेल, अशी चर्चा होती. त्यानंतर राज्य सरकारने कर्जमाफीच्या दिशेने मोठं पाऊल टाकलं आहे. कर्जमाफीबाबत मुख्यमंत्र्यांनी मोठी घोषणा केली आहे. कर्जमाफीची पहिली यादी जाहीर होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या घोषणने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर मोठं भाष्य केलं. दिवंगत अजितदादांच्या जयंतीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'लाडके उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांची उद्या जयंती आहे. या निमित्ताने अतिशय सुंदर असं चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आलेलं आहे, ज्यात दादांचं जीवन पाहायला मिळतंय. त्यांची कारकीर्द या निमित्ताने पाहायला मिळतेय. दादांचा उमदा स्वभाव, त्यांच हास्य त्यांची कठोरता हे सगळं यानिमित्ताने पाहायला मिळत आहे'.नवी दिल्लीतील आंदोलनावर मुख्यमंत्री फडणवीसांनी विरोधकांवर टीका केली. 'कुठलंही आंदोलन असलं की, काही चुकीच्या प्रवृत्ती आंदोलनात शिरत असतात आणि आपला स्वार्थ साधत असतात. दिल्लीतल्या आंदोलनात अनेक राजकीय पक्ष आणि संघटना आपापले हेतू साध्य करून अराजकता माजवण्याचा प्रयत्न करतात. दिल्लीतील आंदोलन हे चेहराहीन होते.

# महिलेकडून महिलेचा चाकूने भोसकून खून

शिर्डी - जुन्या वादातून महिलेनेच महिलेवर चाकूने वार करत खून केल्याचा धक्कादायक प्रकार शिर्डी येथे रविवारी (ता. १९) रात्री घडला. साई समाधी मंदिराजवळ असलेल्या दक्षिण बाजूच्या रस्त्यावर ही घटना घडली. जयश्री साईनाथ क्षीरसागर (वय २७) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे, तर फिजा पटेल (वय २१) असे आरोपी महिलेचे नाव आहे.

खून झालेली महिला जयश्री क्षीरसागर आणि अंजली खंडीझोड (वय २२) यांच्यात पूर्वीपासून वाद आरोपी फिजा पटेल सुरू होते. हा खून करताना हिने अंजली हिच्याशी मोबाईलवरून संपर्क साधला होता, तसेच हत्येसाठी वापरण्यात आलेला चाकूदेखील अंजलीनेच उपलब्ध करून दिल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याची माहिती पोलिस उपाधीक्षक अमोल भारती यांनी दिली. साई समाधी मंदिराच्या भिंतीला लागून जयश्री क्षीरसागर असलेल्या बाजारपेठेत फिजा पटेल हिने जयश्री क्षीरसागर यांच्यावर सपासप चाकूचे वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेली महिला आणि हल्ला करणारी आरोपी महिला पाहून परिसरात एकच खळबळ उडाली. भाविकांची पळापळ झाली, तर दुकानदारही हादरले. ज्या ठिकाणी खून झाला, तेथून साई मंदिराची पोलिस चौकी हाकेच्या अंतरावर आहे, तसेच साई संस्थानचे सुरक्षा रक्षकही या परिसरात तैनात असतात. मात्र, घटना घडली त्यावेळी घटनास्थळी कोणीही उपस्थित नसल्याचे दिसून आले.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# भोजदरी जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना ओळखपत्रांचे वितरण



युवावार्ता (प्रतिनिधी) : संगमनेर - संगमनेर तालुक्यातील भोजदरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना डॉ. सदानंद काशिनाथ डोंगरे (केंद्रप्रमुख, बोटा-राजापूर) यांच्या सौजन्याने ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शालेय शिस्तीला चालना देणारा हा उपक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाला पंचायत समिती संगमनेरचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शैक्षणिक विस्तार अधिकारी तथा प्रशिक्षणार्थी उपशिक्षणाधिकारी पिंकी वाजे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश पोखरकर, ग्रामपंचायत सदस्य दिलीप पिंपळे, माजी अध्यक्ष पोपट वाळूंज व जिजाभाऊ भुतांबरे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य बाबाजी हांडे, शिक्षणतज्ज्ञ सदस्या वैशाली दिनेश सावंत, सदस्या सीमा आकाश शिंदे, अमोल मते, तसेच मिनानाथ मते, गोविंद वाळूंज, ज्ञानदेव डोंगरे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना ओळखपत्रांचे महत्त्व सांगत नियमित शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या शिक्षिका निर्मला वाळूंज तसेच शिक्षक अशोक साळवे, बाळासाहेब कडाळे आणि रामदास लहामटे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाबद्दल पालक व ग्रामस्थांनी उपक्रमाचे कौतुक केले.

# संत ज्ञानेश्वर विद्यालयात 'आनंददायी शनिवार'

## मानवी साखळीतून विद्यार्थ्यांनी साकारल्या भूमितीच्या आकृत्या

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नज दुमाला येथे 'आनंदादायी शनिवार' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित शिक्षणाचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मानवी साखळीच्या माध्यमातून आयत, वर्तुळ, त्रिकोण तसेच तिरपी रेष यांसारख्या विविध भूमितीय आकृत्या साकारत आनंददायी शिक्षणाचा अनोखा अनुभव घेतला.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना भूमितीतील संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून समजावून देणे आणि पुस्तकी ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. मैदानावर मानवी साखळी तयार करून विविध आकृत्या रेखाटल्यामुळे विद्यार्थ्यांना भूमिती अधिक रंजक व सहज समजली. या उपक्रमात विद्यालयातील तब्बल ४७५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणनुसार अनुभवाधारित शिक्षण, संवाद, सहभाग आणि आनंदातून शिक्षण या संकल्पनांना या उपक्रमातून प्रभावी चालना मिळाली. तसेच योग, प्राणायाम, शारीरिक शिक्षण आणि गणित या विषयांचा सुंदर समन्वय साधण्यात आला, अशी माहिती गणित शिक्षिका श्रीमती मनीषा शेळके यांनी दिली.



यावेळी मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे म्हणाले, पुस्तकातील आकृत्या विद्यार्थी स्वतः साकारतात, तेव्हा शिक्षण केवळ समजत नाही तर ते अनुभवले जाते. आनंदातून शिकणे, कृतीतून समजून घेणे आणि सहकार्याची भावना विकसित करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडाशिक्षक मंगेश गडाख, योग मार्गदर्शक बी. आर. पिंगळे, गणित शिक्षिका मनीषा शेळके तसेच वसंत बोडखे आणि मच्छिंद्र पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मेडिकव्हर हॉस्पिटलचे कर्मचारी लाचलुचपतच्या जाळ्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून शस्त्रक्रिया करण्यासाठी २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी संगमनेर येथील नामांकित हॉस्पिटल 'मेडिकव्हर'चे दोन कर्मचारी लाचलुचपतच्या जाळ्यात अडकले आहेत.

डाटा इन्ट्री ऑपरेटर सुभाष दगडू धादवड (रा. घुलेवाडी फाटा, संगमनेर) व ऑपरेशन मॅनेजर सुजित दामोदर गायकवाड (रा. मालवुड रोड, संगमनेर) अशी या लाचखोर कर्मचाऱ्यांची नावे आहेत. याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिस निरीक्षक छाया देवरे यांच्या फिर्यादीवरून संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही आरोपी है संगमनेर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये काम करतात.

हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे कामकाज पाहणारा सुभाष याने तक्रारदार यांच्या आईची शस्त्रक्रिया व उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून करून देण्यासाठी २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. पैसे दिल्याशिवाय बिल भेटणार नाही असे सांगून सुभाष याने लाच स्वीकारण्याची तयारी दर्शविली, तसेच हॉस्पिटलचा मॅनेजर सुजित गायकवाड यांच्याकडे बिलाबाबत विचारणा केली असता त्यानेही, जे ठरले आहे त्यात कमी होणार नाही, असे सांगून सुभाष याला लाच मागणीस प्रोत्साहन दिले. याबाबत व्हाइस रेकॉर्ड मेमरी कार्डमध्ये रेकॉर्ड झालेले आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटलचे हे दोन कर्मचारी रुग्णांकडून अशा प्रकारे पैसे उकळत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

# संगमनेर तालुक्यासाठी...

पान १ वरून - साठ्यातून ३४९.५२ मे.टन युरिया संगमनेर तालुक्यातील कृषी विक्रेत्यांकडे वितरित करण्यात आला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यात रिमझिम पावसाला सुरुवात झाली असून पिकांच्या वाढीसाठी ही वेळ अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अशा निर्णायक टप्प्यावर शासनाने बफर स्टॉक खुला केल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. गुंजाळवाडीचे सरपंच व प्रगतशील शेतकरी नरेंद्र गुंजाळ यांनी, युरिया उपलब्ध होणे ही दिलासादायक बाब असली तरी प्रत्येक शेतकऱ्याला आवश्यक त्या प्रमाणात आणि वेळेत खत मिळणे गरजेचे आहे. शासनाने त्यासाठी प्रभावी नियोजन करावे, अशी मागणी केली.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## भक्ती, समता आणि मानवतेचा सेतू - संत लतीफशहा

मुसलमान कुळी जन्म जहाला।
तही तो विठ्ठल पायी रंगला।।
लतीफ म्हणे हाचि देव खरा।
पंढरीनाथा तुझाचि आसरा।।

वारकरी संप्रदायाचा इतिहास चोखामेळा, सावता माळी, गोरोबा कुंभार यांच्यामुळे समृद्ध झाला आहे. याच मालेत संत कबीर, शेख महंमद यांच्यासोबत संत लतीफशहांचे नाव आदराने घेतले जाते. मूळचे सुफी परंपरेतील असूनही महाराष्ट्राच्या मातीत आल्यावर ते पंढरीच्या विठ्ठलाचे पक्के वारकरी बनले. त्यांचा हा प्रवास भक्तीचा अनोखा मार्ग दाखवतो.

जीवन आणि काळ

संत लतीफशहा यांच्या जन्माविषयी फारसे ठोस संदर्भ मिळत नाहीत. बहुतेक इतिहासकारांच्या मते ते सोळाव्या ते सतराव्या शतकात, म्हणजे संत तुकाराम महाराजांच्या सुमारास होऊन गेले. त्यांचा जन्म मुस्लिम कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांना ईश्वरप्राप्तीची आणि गूढ ज्ञानाची ओढ होती.

त्या काळात महाराष्ट्रभर वारकरी संप्रदायाची लाट होती. गावोगावी टाळ-मृदंगाचा गजर आणि 'ज्ञानबा-तुकाराम'चा जयघोष होता. एकदा वाटेने जाताना लतीफशहांनी वारकऱ्यांची दिंडी पाहिली. वारकऱ्यांच्या डोळ्यातील निस्सीम आनंद आणि विठ्ठल नामाची शक्ती पाहून त्यांचे अंतःकरण द्रवले. त्यांना जाणीव झाली की जो देव या लोकांना एवढा आनंद देतो तोच माझा अल्लाह आहे आणि तोच माझा विठ्ठल आहे.

सुफी आणि वारकरी भक्तीचा मिलाफ

लतीफशहा मूळचे सुफी विचारसरणीचे अभ्यासक होते. सुफी परंपरेत ईश्वराला 'माशुका' म्हणजे प्रेयसी आणि स्वतःला 'आशिक' म्हणजे प्रेमी मानले जाते. वारकरी संप्रदायातील मधुराभक्ती आणि सुफींमधील 'इश्क-ए-हकीकी' म्हणजे ईश्वरीय प्रेम यात मोठे साम्य आहे. लतीफशहांनी या दोन्हींचा सुंदर संगम घडवला.

ते म्हणत, अल्ला आणि विठ्ठल यात फरक नाही. विठ्ठलाची पाऊले चंद्रभागेच्या वाळवंटात उमटतात आणि अल्लाचा नूर संपूर्ण सृष्टीत भरलेला आहे. त्यांनी डोक्यावर वारकरी टोपी, गळ्यात तुळशीची माळ आणि हात टाळ घेऊन स्वतःला विठ्ठलाचा चाकर म्हणून स्वीकारले आणि



वारीच्या वाटेवर चालू लागले.

भक्तीचे चमत्कार

लतीफशहांच्या जीवनातील दोन प्रसंग आजही भाविक मोठ्या श्रद्धेने सांगतात.

एकदा समाजातील काही लोकांनी त्यांना विचारले, तू मुसलमान आहेस, मग पंढरपूरला का जातोस? तुला हजला जायला हवे. लोकांच्या आग्रहास्तव ते मक्केला जाण्यासाठी निघाले. जहाजात बसले तरी त्यांचे मन पंढरपुरातच होते. मक्केला पोहोचून जेव्हा त्यांनी काबासमोर माथा टेकवला, तेव्हा त्यांना तिथे साक्षात विटेवर उभा असलेला विठ्ठल दिसला. त्यांना प्रचिती मिळाली की देव भक्ताच्या भावात आहे, इमारतीत नाही. व्याकुळ होऊन त्यांनी तिथूनच पंढरीनाथाचा धावा केला.

दुसरा प्रसंग वारीचा आहे. एकदा लतीफशहा अत्यंत थकले होते, पायाला फोड आले होते. तरीही ते गात होते. तेव्हा दिंडीत एक सावळा तरुण आला. त्याने लतीफशहांचा टाळ हातात घेतला आणि इतका सुंदर नाचला की सगळे वारकरी मंत्रमुग्ध झाले. लतीफशहांचा थकवा क्षणात गेला. पंढरपूर जवळ आल्यावर तो तरुण अचानक नाहीसा झाला. तेव्हा लतीफशहांना उमजले की आपल्या भक्ताची वारी सुकर करण्यासाठी स्वतः पांडुरंग वारकरी बनून आला होता.

साहित्य आणि विचार

संत लतीफशहांनी मराठीत अनेक अभंग, पदे आणि गवळणी रचल्या. त्यांची भाषा सोपी आहे आणि त्यावर सुफी काव्याचा प्रभाव आहे. त्यांच्या लेखनातून जात-पात आणि कर्मकांडावर स्पष्ट प्रहार दिसतो.

ते म्हणतात, देवाने माणसाला जन्म देताना त्यावर कोणताही शिक्का मारलेला नाही. माणूसच अहंकाराने भिंती उभ्या करतो. त्यांच्या गवळणींमध्ये कृष्णभक्तीचा आणि विठ्ठलभेटीचा आर्त भाव आहे. ते हक्काने विठ्ठलाला विचारतात, जर तू सर्वांचा बाप आहेस तर माझ्यासाठी दारे बंद का? त्यांच्या या निस्सीम भक्तीमुळे तत्कालीन समाजाला आणि पुजाऱ्यांनाही त्यांना मान द्यावा लागला.

संदेश आणि स्मृती

लतीफशहांनी आपले संपूर्ण आयुष्य विठ्ठल भक्ती आणि समाजप्रबोधनात घालवले. महाराष्ट्रातील सुफी आणि वारकरी चळवळींमधील ते महत्त्वाचे दुवे होते. त्यांच्या समाधीच्या स्थानाविषयी वेगवेगळी मते असली तरी मराठवाडा आणि खानदेशच्या सीमाभागात त्यांची स्मृती आजही जपली जाते. अनेक ठिकाणी दर्गे आणि मंदिरांमध्ये हिंदू-मुस्लिम एकत्र येऊन त्यांच्या नावाने उरूस आणि भजन करतात.

आज धर्माच्या नावावर भिंती उभ्या होत असताना संत लतीफशहांचे चरित्र अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांनी दाखवून दिले की देव कोणताही धर्म पाहत नाही, तो फक्त भाव पाहतो.

संत लतीफशहा हे वारकरी संप्रदायातील एक सुगंधी फूल आहेत. विठ्ठल विठ्ठल गजरी, अवघी दुमदुमली पंढरी या घोषात त्यांचे नाव कायम एका वेगळ्या उंचीवर राहील.



संकलन, संतचरणरज...
**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**
(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४
सौजन्य - निजध्यास...

# सह्याद्री व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वृक्षारोपण

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - पर्यावरण संरक्षणाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये बालवयापासून रुजावी आणि वृक्षसंवर्धनाची संस्कृती विकसित व्हावी, या उद्देशाने अभिनव शिक्षण संस्था अकोले संचलित सह्याद्री व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल , राजूर येथे क्टिव्हिटी फन डे अंतर्गत वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमासाठी पर्यावरणप्रेमी राहुल राऊत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी रमेश लेंभे, दत्ता कोंडार, शाळेच्या प्राचार्या सौ. स्मिता पराड तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी राहुल राऊत यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष हेच जीवनाचे खरे आधारस्तंभ असल्याचे सांगत पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जपण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. तसेच त्यांनी शाळेला वृक्षांची रोपे भेट देत पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात मोलाचे योगदान दिले.

यानंतर विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. झाडे लावा, झाडे जगवा आणि एक विद्यार्थी - एक झाड या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. प्रत्येक रोपाचे संगोपन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारत हरित भविष्यासाठी योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.



पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गप्रेम, सामाजिक जबाबदारी आणि वृक्षसंवर्धनाची भावना दृढ करणारा ठरला.

# लोकसहभाग कृतीत उतरविल्यास शैक्षणिक गुणवत्ता वाढते - गोरक्षनाथ शिंदे

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरातील ज्ञानमंदिर समजल्या जाणाऱ्या शाळेच्या विकासासाठी लोकसहभागातून योगदान दिल्यास शैक्षणिक गुणवत्तेत निश्चितच भर पडेल, असे प्रतिपादन सेवानिवृत्त जिल्हा शिक्षक व प्रशिक्षक संस्था, संगमनेरचे माजी अध्यक्ष गोरक्षनाथ शिंदे यांनी केले.



संगमनेर शहरातील नवीन मराठी माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी तथा पुणे येथील एरोस्पेस कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेले ऋषिकेश शिंदे हे दरवर्षी आपल्या वडिलांच्या वाढदिवसानिमित्त इयत्ता पहिली ते दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना वह्या, शैक्षणिक साहित्य तसेच रोख पारितोषिकांचे वितरण करतात. यावर्षीही हा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला.


यावेळी मनोगत व्यक्त करताना गोरक्षनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ शैक्षणिक अभ्यास नव्हे, तर वक्तृत्व, निबंध, हस्ताक्षर आदी विविध स्पर्धांमध्ये सहभाग आवश्यक असल्याचे सांगितले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देत त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न करावेत, तसेच समाजातील प्रत्येक नागरिकाने शाळेच्या प्रगतीसाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी रोख स्वरूपात पारितोषिके देण्याची घोषणाही त्यांनी केली.

कार्यक्रमास नवीन शाळा मंडळाचे अध्यक्ष मिलिंद शेठ सराफ, सचिव अनिरुद्ध उपासनी, ज्येष्ठ संचालक शशांकजी गंधे, मुकुंदजी डांगे, संदीप मुळे, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शर्माळे सर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भालेराव मॅडम, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आव्हाड सर यांनी केले, तर भरीतकर सर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गुंजाळ सर, बोबडे मॅडम, लांडगे सर, गायकवाड सर, सूर्यवंशी मॅडम तसेच कुलकर्णी सर, गोडगे सर, मांडे सर आणि मुर्तडक सर यांनी मोलाचे सहकार्य केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# विशेष संपादकीय...

## श्रद्धांजली...



## डॉ. कुमार सप्तर्षी

### समाजवादी विचारधारेचा शेवटचा तारा निखळला

**युक्रांदचे डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन म्हणजे महाराष्ट्राला झालेली वेदना आहे. सहिष्णू आणि समाजवादी विचारांनी येणाऱ्या प्रश्नांना तोंड देत आणि सत्याग्रही विचाराने वाटचाल करणारे डॉ. कुमार सप्तर्षी हे हजारो युवकांचे स्मृतिस्थान होते. दैनिक युवावार्ता परिवाराचे स्नेही म्हणून त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत असायचे. त्यांच्या प्रती कृतज्ञता म्हणून त्यांच्या कार्यास अभिवादन म्हणून दैनिक युवावार्ता त्यांच्या स्मृतींना सक्रियतेने उजाळा देत आहे.**

मी एमबीबीएसचे शिक्षण घेत असताना एका कार्यक्रमादरम्यान माझी आणि डॉ. कुमार सप्तर्षी यांची ओळख झाली. वैजापूरचे नाव ऐकताच त्यांनी सांगितले की त्यांची बहिण ही वैजापूर येथील दिवंगत डॉ. मधुकरराव थावरे यांच्या पत्नी होत्या. या नात्याने डॉ. मधुकराव थावरे त्यांचे मेहुणे लागत. या सामायिक ओळखीमुळे आमच्यात एक वेगळाच स्नेहबंध निर्माण झाला.

मी त्यांना भेटलो की ते मला आवर्जून म्हणायचे की, अमोल, तू युवक क्रांती दलात का सामील होत नाहीस? युक्रांदमध्ये ये,. जशी ऑफर ते मला द्यायचे, तशीच ती अनेक तरुणांनाही द्यायचे. १९८०-९० च्या दशकात काँग्रेसचा प्रभाव असताना 'युवक क्रांती दल'च्या माध्यमातून सत्तेला आव्हान देणारा एक प्रभावी युवकांचा दबावगट उभा करण्यामध्ये डॉ. कुमार सप्तर्षी यांचे मोठे योगदान होते. पुढे इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे युग सुरू झाल्यानंतर अनेक दूरचित्रवाणी चर्चांमध्ये आम्ही एकत्र सहभागी व्हायचो. चर्चेच्या भरात अनेकदा ते, अमोल सांगतोय ते बरोबर आहे, असे म्हणून माझी बाजू उचलून धरायचे. समाजसुधारणा व्हायलाच हवी, यासाठी त्यांच्या मनात प्रचंड तळमळ होती. एखादा कार्यक्रम संपल्यानंतरही ते अर्धा-अर्धा तास त्याविषयी चर्चा करत बसायचे. यावर काय करता येईल?, तू काय करायला हवं? याबाबत ते मनापासून मार्गदर्शन करायचे. प्रत्यक्ष भेट झाली नाही तरी एखादा लेख वाचून किंवा सहज अनौपचारिक गप्पांसाठी त्यांचा फोन यायचाच. तरुणांनी राजकारणात लवकर प्रवेश करायला हवा, या मतावर ते ठाम होते. चांगले, बुद्धिमान आणि नीतिवान लोक कितीही अडथळे आले तरी राजकारणात आले पाहिजेत, सत्तास्थानांना सतत प्रश्न विचारले पाहिजेत आणि संघर्ष कितीही मोठा असला तरी विरोधाची धार बोथट होता कामा नये, हे ते सातत्याने सांगायचे. विशेष म्हणजे, ज्या मूल्यांचा त्यांनी तरुणांना उपदेश केला, ती मूल्ये त्यांनी स्वतःच्या आयुष्यातही तितक्याच प्रामाणिकपणे जपली. २०१४ नंतर देशात भारतीय जनता पक्षाची सत्ता असतानाही गांधीवादी विचार जिवंत ठेवण्यासाठी आणि गांधी भवनसारख्या संस्थांमधून वैचारिक चळवळी सुरू ठेवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची संवादशैली. एखादा साधा विषयही ते जुने संदर्भ, कविता, किस्से आणि ऐतिहासिक दाखले यांची जोड देऊन इतक्या रंजक पद्धतीने मांडायचे की श्रोते मंत्रमुग्ध व्हायचे. त्यांच्याकडे अफाट वाक् चातुर्य होते. त्यामुळे कोणत्याही पदावर नसतानाही ते मराठी प्रसारमाध्यमांचे कायमचे लाडके व्यक्तिमत्त्व राहिले. त्यांचा मुलगा कबीर हाही डॉक्टर आहे. स्वतः डॉ. सप्तर्षी हे बी. जे. मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी होते. त्यांनी वैद्यकीय प्रॅक्टीस फारशी केली नसली तरी या नात्यामुळे माझ्यासारख्या तरुण डॉक्टरांविषयी त्यांना विशेष आपुलकी होती. बी. जे.मध्ये आम्ही नाटकं आणि चळवळी करत करत वेळ मिळाला तर डॉक्टर होत होतो, असे ते मिश्कीलपणे म्हणायचे. 'येरवड्याचे दिवस' हे त्यांचे पुस्तक त्यांनी स्वतः सही करून मला भेट दिले होते. तुरुंगातील आयुष्याचे त्यांनी केलेले रसभरीत आणि वास्तववादी वर्णन प्रत्येकाने आवर्जून वाचावे असेच आहे. त्या काळात डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. अरुण लिमये, डॉ. नरेंद्र दाभोलकर, रंगराव रायचुरे, डॉ. रत्नाकर महाजन, डॉ. भालचंद्र कांगो अशा वैद्यकीय क्षेत्रातील अनेक व्यक्तींनी समाजवादी आणि गांधीवादी विचारांना वाहून घेतले होते. कुमार सप्तर्षी यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने झाली आणि त्यातील अनेक यशस्वीही ठरली.

सोलापूर येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या संपूर्ण खाजगीकरणाच्या विरोधात त्यांनी मोठा लढा उभारला. एका महत्त्वाच्या वैद्यकीय महाविद्यालयाचे खाजगीकरण रोखण्यात त्यांचे योगदान मोठे मानले जाते. दलित, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांसाठी प्राणपणाने लढणारा एक सच्चा कार्यकर्ता आज महाराष्ट्राने गमावला आहे. ज्या काळात समाजवादी विचारांना एक वेगळे आकर्षण आणि वैचारिक प्रतिष्ठा होती, ज्या काळात कुमार सप्तर्षींसारखे विचारवंत हे समाजाची अमूल्य संपत्ती आहेत असे मानणारा मोठा वर्ग अस्तित्वात होता, तो काळ आधीच मागे पडला होता. आता त्या काळाचे प्रतिनिधित्व करणारे डॉ. कुमार सप्तर्षीही आपल्यातून निघून गेले आहेत.

**- डॉ. अमोल अन्नदाते**

# सिद्धी पॅरामेडिकलच्या विद्यार्थ्यांची उज्ज्वल यशाची परंपरा कायम !


रासकर प्रणव


हरो सुहास


होडगर विजय

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सिद्धी कौशल्य विकास संस्था, संगमनेर येथे महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन (ऊचडढ), रेडिओलॉजी टेक्निशियन व ऑपरेशन थिएटर टेक्निशियन हे अभ्यासक्रम यशस्वीपणे चालविले जातात.

नुकताच जाहीर झालेल्या एप्रिल २०२६ च्या डीएमएलटी परीक्षेच्या निकालात संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली.

यामध्ये प्रणव रासकर याने ८०.४४% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सुहास हसे याने ७५.३३% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर विजय होडगर याने ७३.७८% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. या यशाबद्दल संस्थेच्या वतीने डॉ. तृप्ती रांका यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मधुमक्षिकापालन योजनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत १८ जून २०२४ पासून राज्यात मधु केंद्र (मधुमक्षिकापालन) योजना राबविण्यात येत असून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, युवक, युवती तसेच संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी टी. आर. मुंडे यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मधुउद्योगाचे मोफत प्रशिक्षण, साहित्य खरेदीसाठी ५० टक्के अनुदान व उर्वरित ५० टक्के लाभार्थी हिस्सा, शासनाने निर्धारित केलेल्या हमीभावाने मध खरेदी, विशेष तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण तसेच मधुमक्षिकापालन, मधमाशांचे संवर्धन व जनजागृतीबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

योजनेअंतर्गत वैयक्तिक मधुमक्षिकापालन घटकासाठी अर्जदार साक्षर असावा. अर्जदाराचे वय १८ वर्षांपेक्षा अधिक असावे. स्वतःची शेती असल्यास प्राधान्य देण्यात येईल. मधु केंद्र चालक घटकासाठी संबंधित व्यक्ती किमान दहावी उत्तीर्ण व २५ वर्षांपेक्षा अधिक वयाची असावी. संबंधित व्यक्तीच्या किंवा तिच्या/त्याच्या कुटुंबातील सदस्याच्या नावावर किमान एक एकर स्वतःची अथवा भाडेतत्त्वावरील शेती असावी. तसेच मधुमक्षिकापालन, प्रजनन व मध उत्पादनाबाबत प्रशिक्षण देण्याची क्षमता असावी.

केंद्र चालक संस्थांसाठी संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. संस्थेच्या नावावर अथवा भाडेतत्त्वावर घेतलेली किमान चार हजार चौरस फूट सुसज्ज इमारत असावी. तसेच मधुमक्षिकापालन, प्रजनन व मध उत्पादनाबाबत प्रशिक्षण देण्याची क्षमता असावी. लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर प्रशिक्षणापूर्वी मध व्यवसाय सुरू करण्यासंदर्भातील बंधपत्र मंडळाकडे लेखी सादर करणे आवश्यक राहील. तसेच मंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी प्रशिक्षण घेणे लाभार्थ्यांसाठी बंधनकारक असेल. योजनेसंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ. सप्तर्षींच्या निधनान सामाजिक चळवळीची मोठी हानी - ना.विखे पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर जिल्ह्याचे भूमिपुत्र आणि अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार, ज्येष्ठ समाजवादी नेते, गांधीवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे.

आपल्या संपूर्ण राजकीय आणि सामाजिक वाटचालीत त्यांनी समाजातील सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवला. ग्रामीण जीवनाशी त्यांची असलेली नाळ त्यांच्या विचारांत आणि कृतीत कायम दिसून आली. शेतकरी, युवक आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच परखड आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडली.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील आणि डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यातील मैत्री, परस्पर सन्मान आणि जिव्हाळ्याचे ऋणानुबंध अखेरपर्यंत कायम राहिले. त्यांच्या निधनाने सामाजिक आणि वैचारिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.डॉ. कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

# वृत्तपत्र विक्रेते भाऊसाहेब नाना शिंदे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील साकुर येथील वृत्तपत्र विक्रेते भाऊसाहेब नाना शिंदे यांचे वयाच्या ७९ व्यां वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात ३ मुले सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते साकूर पंचक्रोशी मध्ये गेल्या ३५ वर्षापासून पेपर विक्रीचा व्यवसाय करत हॉटेल व्यवसाय यामध्ये सुद्धा आपला नावलौकिक मिळवला होता. अतिशय मनमिळावू स्वभावाचे होते त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. ते राजुर प्रकल्प कार्यालयातील लिपिक प्रमोद शिंदे, सतीश शिंदे व विनायक शिंदे यांचे वडील होत. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# हाफिज मौलाना अब्दुल माजिद सय्यद यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील कुरआन शरीफ मुखोद्गत असलेले हाफिज मौलाना अब्दुल माजिद सय्यद (वय ४५)

रहमतनगर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या अकाली निधनामुळे समाजात हळहळ व्यक्त होत आहे.

अपनानगर कुरण रोड येथील मशिदीत त्यांनी सुमारे १५ वर्षे धार्मिक मार्गदर्शक व कुरआन उपदेशक म्हणून सेवा बजावली. कुरआनचे गाढे ज्ञान, साधी राहणी आणि मुलांमध्ये धार्मिक शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी ते विशेषत्वाने ओळखले जात होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच मुंबई, पुणे, बीड तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातून नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने अंत्ययात्रेस उपस्थित राहून त्यांना अखेरचा निरोप दिला. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३


क्र. कावी/ जन्म नोंद/५७८/२०२६ दिनांक - २४/०६/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री.इरफान शमशुद्दीन, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक ११/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे इरफान शमशुद्दीन मन्सुरी यांचा **जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०१/१९९३** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849






# संगमनेर खुर्द रस्ता खड्डेमय

## संगमनेर पुरोहित संघाचे निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर खुर्द येथील प्रवरा नदीवरील छोट्या पुलापासून पुढे असलेल्या सिमेंट काँक्रेट रस्त्यापर्यंतच्या मधल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याचा पुढील भाग सिमेंट काँक्रेटचा करण्यात आला असला तरी प्रवरा नदी छोटा पूल ते सिमेंट काँक्रेट रस्ता या दरम्यानचा टप्पा अद्याप खड्डेमय असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

या मार्गावर मेडिकल कॉलेज, इतर शैक्षणिक संस्था, बँक तसेच विविध देवस्थाने असल्यामुळे दररोज शेकडो विद्यार्थी, नागरिक, भाविक, कर्मचारी आणि वाहनचालकांची मोठी वर्दळ असते. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वारांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संगमनेर पुरोहित संघाच्या वतीने ग्रामपंचायत व पंचायत समितीकडे लेखी निवेदन देण्यात आले आहे. रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून प्रवरा नदी छोटा पूल ते सिमेंट काँक्रेट रस्ता हा संपूर्ण टप्पा दर्जेदार पद्धतीने विकसित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही न झाल्यास संगमनेर पुरोहित संघाच्या वतीने उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित विभागाने तातडीने या प्रश्नाची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

पान १ वरून

# दिल्लीत आंदोलन...

परंतु त्यानंतर काही वेळातच आंदोलक पुन्हा तिथे एकत्र जमले.


या पार्श्वभूमीवर, एनडीएच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत पंतप्रधान मोदींनी सांगितले की, पेपरफुटीच्या मुद्द्याचे राजकारण केले जाऊ नये आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही दिली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मागणी केली की, या मुद्द्यावरून केवळ शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनीच नव्हे, तर पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनीही राजीनामा दिला पाहिजे; तसेच त्यांनी जबाबदारी निश्चित केली जाण्यावरही जोर दिला.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी 'नीट' परीक्षेचा पेपर फुटल्याच्या मुद्द्यावर चर्चेची मागणी केली, तसेच फलक झळकावून आणि घोषणाबाजी करून निषेध नोंदवला.

तत्पूर्वी, सकाळी अधिवेशन सुरू होताच दोन्ही सभागृहांचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले होते. सभागृहाबाहेर बोलताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितले की, त्यांना संसदेत बोलू दिले जात नाही आणि लोकशाहीत अशा प्रकारचे वर्तन चुकीचे आहे. दरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही लोकसभेच्या अध्यक्षांची भेट घेतली.

# एक होता धुरंधर...

**अजित देशमुख, सहसचिव**
**महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई**



## उपमुख्यमंत्री अजितदादांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन

**रहने को सदा दहर में आता नहीं कोई,**
**दादा, तुम जैसे गए ऐसे भी जाता नहीं कोई...**

स्व. अजितदादांच्या पहिल्या जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या नियोजनाची चर्चा कानावर आली आणि मन पुन्हा एकदा सुन्न झाले. दादांचा अतिदुर्दैवी अपघाती मृत्यू आजही अस्वस्थ करतो. त्यांच्या अकाली जाण्याने निर्माण झालेली पोकळी काळाच्या ओघात अधिकच तीव्र होत चालली आहे.

आजच्या राजकारणात दिखाऊपणा, प्रसिद्धीची हाव आणि दांभिकपणा वाढत असताना, अजितदादा मात्र आपल्या स्पष्टवक्तेपणा, प्रामाणिकपणा, शिस्त आणि कामाप्रती निष्ठेमुळे वेगळे ठरले. कठीण प्रसंगात अधिक तेजाने तळपणारे ते खरे धुरंधर नेतृत्व होते.

मला त्यांच्या स्वीय सहाय्यक, ओएसडी आणि खाजगी सचिव म्हणून मे २००५ ते सप्टेंबर २०१४ या नऊ वर्षांहून अधिक काळ अत्यंत जवळून काम करण्याची संधी मिळाली. सुरुवातीला त्यांच्या लष्करी शिस्तीचे आणि तापट स्वभावाचे दडपण जाणवत होते; मात्र कालांतराने बाहेरून कठोर वाटणाऱ्या या व्यक्तिमत्त्वामागे अत्यंत संवेदनशील, प्रेमळ आणि कार्यकर्त्यांवर जीवापाड प्रेम करणारा माणूस असल्याची खात्री पटली.

दादांचा शब्द म्हणजे शब्द. राजकारणात दिलेली आश्वासने विसरण्याची पद्धत असताना, दादांनी दिलेला प्रत्येक शब्द पाळण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न केले. त्यांच्या कार्यालयात प्रत्येक आश्वासनाचा काटेकोर पाठपुरावा करणारी स्वतंत्र व्यवस्था होती. अनेक सामान्य कार्यकर्त्यांना त्यांनी न्याय मिळवून दिला. जो पूरे करे वादा, उसका नाम अजितदादा हे त्यांच्याबाबत अक्षरशः खरे होते.

पहाटेपासून रात्रीपर्यंत त्यांचा दिवस लोकांसाठीच असायचा. सकाळी सातपासून सामान्य नागरिकांसाठी त्यांचे दरवाजे खुले असत. अधिकारी असो वा कर्मचारी, काम पूर्ण होईपर्यंत त्यांचा पाठपुरावा थांबत नसे. वेळेचे काटेकोर नियोजन, नेमके निर्णय आणि काम पूर्णत्वास नेण्याची तळमळ ही त्यांची खरी ओळख होती.

दादांचा जनता दरबार मी वर्षानुवर्षे जवळून पाहिला. अर्जदाराचा पक्ष, जात किंवा धर्म नव्हे, तर त्याच्या अर्जातील विषय महत्त्वाचा असायचा. विषयाचे सखोल ज्ञान, संबंधित अधिकाऱ्याला नेमक्या सूचना आणि परिणामकारक अंमलबजावणी यामुळे हजारो लोकांची कामे मार्गी लागली.

प्रशासकीय व्यवस्थापन, सहकार, शिक्षण, बँकिंग, क्रीडा आणि विकासकामांचा त्यांचा अभ्यास विलक्षण होता. मोठ्या विकासकामांबरोबरच लहानसहान बाबींमध्येही ते स्वतः लक्ष घालत. कामाचा दर्जा, सौंदर्यदृष्टी, स्वच्छता आणि गुणवत्ता याबाबत ते अत्यंत आग्रही होते.

कोरोना संकटाच्या काळात मंत्रालय ओस पडले असताना दादा रोज उपस्थित राहून राज्याच्या यंत्रणेला दिशा देत होते. स्वतः कोरोना संसर्गातून बाहेर पडूनही त्यांनी पुन्हा त्याच जोमाने काम सुरू ठेवले. मंत्रालयाला आग लागली तेव्हाही सर्वजण बाहेर



पडत असताना दादा मात्र घटनास्थळी ठामपणे उभे राहून अग्निशमन दलाला मार्गदर्शन करत होते. संकटात नेतृत्व कसे असावे, याचे ते जिवंत उदाहरण होते.

प्रसिद्धीपासून ते नेहमी दूर राहिले. आपण आपले कर्तव्य करायचे; त्याचा गाजावाजा कशाला? हा त्यांचा सरळ विचार होता. त्यामुळे त्यांच्या अनेक मोठ्या कामांची चर्चा कमी झाली; पण विरोधकांच्या अपप्रचाराला मात्र जास्त प्रसिद्धी मिळाली. तरीही त्यांनी उत्तर केवळ आपल्या कामातूनच दिले.

शरद पवार साहेबांविषयी त्यांच्या मनात अपार आदर, जिव्हाळा आणि कृतज्ञता होती. महत्त्वाचे निर्णय घेताना ते साहेबांशी सल्लामसलत करत आणि अंतिम निर्णयाचा सन्मान राखत. कुटुंबाविषयीही त्यांच्यात तितकाच आत्मीयतेचा भाव होता.

माझ्या वैयक्तिक आयुष्यावरही दादांचा मोठा प्रभाव आहे. त्यांनी माझ्या कोतुळ गावासाठी पिण्याच्या पाण्याची योजना मंजूर केली. दोन वेळा माझ्या घरी येण्याचा योग आला. त्यांच्या आस्थापनेवर काम संपल्यानंतरही त्यांचे दरवाजे माझ्यासाठी कायम खुले राहिले. त्यांचे हे ऋण मी आयुष्यभर विसरू शकणार नाही.

दादांनी उभारलेले विकासाचे मॉडेल, कामाची पद्धत, शिस्त आणि लोकाभिमुख प्रशासन यांचा अभ्यास करून पुढील पिढीने त्यातून प्रेरणा घेतली पाहिजे. हाच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

स्व. अजितदादांच्या पहिल्या जयंतीनिमित्त त्यांना अंतःकरणपूर्वक विनम्र अभिवादन.

अजितदादा अमर रहे!







नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165










स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०





लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क ॲण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# स्व. अजितदादा... एक नेता नव्हे, तर विकासाचा ध्यास घेत कार्यकर्त्यांच्या हृदयात कायम जीवंत राहिलेलं नाव !








## महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन





काही व्यक्ती केवळ राजकारण करत नाहीत, तर इतिहास घडवतात. काही नेते केवळ सत्तेत असतात, तर काही लोकांच्या मनावर राज्य करतात. स्वर्गीय अजितदादा हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. त्यांचं नाव घेताच डोळ्यांसमोर उभा राहतो तो विकासाचा ध्यास, निर्णयक्षम नेतृत्व, अफाट काम करण्याची ऊर्जा, कार्यकर्त्यांवर नितांत प्रेम आणि सामान्य माणसासाठी झटणारा एक संवेदनशील नेता.

आज ते आपल्या सोबत नसले, तरी त्यांचे विचार, त्यांची कार्यपद्धती आणि त्यांनी घडवलेला विकासाचा वारसा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जिवंत आहे. त्यांनी केवळ राजकारण केलं नाही, तर विकासाला दिशा दिली. त्यांनी केवळ सत्ता उपभोगली नाही, तर सत्तेचा उपयोग जनतेच्या हितासाठी केला.

माझ्यासारख्या हजारो कार्यकर्त्यांसाठी अजितदादा म्हणजे प्रेरणा, विश्वास आणि संघर्षातून मार्ग दाखवणारा दीपस्तंभ होते.

बारामतीचा उल्लेख झाला की विकासाचे मॉडेल डोळ्यांसमोर उभे राहते. या परिवर्तनामागे अनेकांचे योगदान असले तरी त्या विकासाला गती देण्यात अजितदादांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. आधुनिक रस्ते, उद्योग, शेतीसाठी पाणी, शैक्षणिक संस्था, सहकार क्षेत्राची मजबुती, औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती यामुळे बारामतीने देशभरात वेगळी ओळख निर्माण केली. ग्रामीण भागाचाही जागतिक दर्जाचा विकास होऊ शकतो, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

राज्याचे अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक वेळा अर्थसंकल्प सादर केले. अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा ताळेबंद नसून राज्याच्या विकासाचा आराखडा असतो, हे त्यांनी सिद्ध केले. शेती, सिंचन, उद्योग, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास आणि रोजगाराला प्राधान्य देत त्यांनी विविध योजना पुढे नेल्या. आर्थिक शिस्त आणि विकासाचा समतोल राखण्याचा त्यांचा प्रयत्न कायम दिसून आला.

जलसंपदा खात्याची जबाबदारी सांभाळताना त्यांनी महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पांना गती दिली. अनेक धरणे, कालवे, उपसा सिंचन योजना आणि पाणी वितरण व्यवस्था मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. दुष्काळी भागात पाणी पोहोचावे, शेतकऱ्यांच्या शेतीला आधार मिळावा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत व्हावी, हा त्यांचा स्पष्ट दृष्टिकोन होता.

अहिल्यानगर जिल्ह्याचाही विकास त्यांच्या निर्णयांमुळे मोठ्या प्रमाणात झाला. निळवंडे धरण प्रकल्पाला गती मिळणे, भंडारदरा धरणाच्या पाण्याचे नियोजन, प्रवरा खोऱ्यातील सिंचन क्षमता वाढविण्याचे प्रयत्न, कालव्यांच्या कामांना निधी, जलसंपदा प्रकल्पांसाठी आर्थिक तरतूद आणि शेतीला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी घेतलेले निर्णय यामुळे हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

संगमनेर, अकोले, राहुरी, श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव, पारनेर, कर्जत, जामखेड आणि जिल्ह्यातील इतर भागातील सिंचन योजनांना विविध टप्प्यांवर आर्थिक बळ मिळाले. शेतीला पाणी मिळाल्यामुळे ऊस, द्राक्षे, डाळिंब, भाजीपाला, फळबागा आणि इतर नगदी पिकांचे क्षेत्र वाढले. ग्रामीण भागातील अर्थचक्र अधिक मजबूत झाले.

सहकार क्षेत्रावर त्यांची विशेष श्रद्धा होती. साखर कारखाने, दूध संघ, पतसंस्था, बँका आणि कृषी प्रक्रिया उद्योग यांना त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. ग्रामीण भागातील युवकांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध व्हावा, उद्योग उभे राहावेत आणि गावातून शहरांकडे होणारे स्थलांतर कमी व्हावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

रस्ते, पूल, वीज, औद्योगिक वसाहती, बाजार समित्या, कृषी प्रक्रिया उद्योग आणि पायाभूत सुविधांमध्ये झालेली वाढ ही त्यांच्या विकासदृष्टीची साक्ष देणारी आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णयांचा लाभ केवळ एका भागालाच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राला झाला. मात्र एवढ्या मोठ्या पदावर असूनही त्यांच्या स्वभावात अहंकार नव्हता. कार्यकर्त्यांशी त्यांचे नाते हे राजकीय नव्हते, तर कौटुंबिक होते. कार्यक्रमात आले की प्रत्येक कार्यकर्त्याला नावाने हाक मारणे, त्याच्या कुटुंबाची विचारपूस करणे, अडचण ऐकून घेणे आणि शक्य ती मदत करणे, हा त्यांचा स्वभाव होता.

त्यांनी कधीही माणसांची किंमत त्यांच्या पदावरून केली नाही; तर त्यांच्या निष्ठेवर, प्रामाणिकपणावर आणि कष्टावर केली. म्हणूनच हजारो कार्यकर्त्यांनी त्यांना नेता नव्हे, तर आपल्या घरातील ज्येष्ठ मानले.

राजकारणात अनेक नेते पाहिले, अनेक भाषणे ऐकली; पण अजितदादांचे व्यक्तिमत्त्व वेगळे होते. त्यांच्या शब्दांत दिखावा नव्हता, तर वास्तव होते. त्यांच्या कृतीत स्वार्थ नव्हता, तर समाजासाठी झटण्याची प्रामाणिक तळमळ होती. त्यांनी कार्यकर्त्यांना घोषणा देण्यापेक्षा काम करण्याची शिकवण दिली.

आजही अनेक कार्यकर्ते सांगतात की संकटाच्या काळात सर्वप्रथम धावून येणारे दादा होते. एखाद्या शेतकऱ्याचे नुकसान झाले, एखादा कार्यकर्ता अडचणीत आला किंवा एखाद्या गरीब कुटुंबाला मदतीची गरज भासली, तर ते शक्य ती मदत करण्याचा प्रयत्न करत. त्यामुळे त्यांच्यावर लोकांचा विश्वास केवळ राजकीय नव्हता, तर भावनिक होता.

दादांनी आम्हाला शिकवले की सत्ता ही लोकांच्या सेवेसाठी असते. त्यांनी सांगितलेले एक तत्त्व आजही मनात कोरलेले आहे-पद कायम राहत नाही; पण माणुसकी कायम लक्षात राहते. हे वाक्य आजही हजारो कार्यकर्त्यांच्या जीवनाला दिशा देत आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक नेता गेला नाही; तर विकासाचा ध्यास घेतलेला, कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आयुष्य झिजवणारा एक कर्तृत्ववान नेता हरपला.

आज आपण त्यांच्या आठवणींना उजाळा देताना केवळ भावनाच व्यक्त करत नाही, तर त्यांनी घालून दिलेल्या विकासाच्या वाटेवर चालण्याचा संकल्पही करतो. प्रामाणिकपणा, कार्यकर्त्यांचा सन्मान, विकासाची दृष्टी, समाजसेवेची भावना आणि माणुसकी हीच त्यांची खरी ओळख होती. दादा, तुम्ही शरीराने आमच्यात नसाल; पण तुमची विकासाची दृष्टी, तुमचे निर्णय, तुमची माणुसकी आणि तुमचे कार्य प्रत्येक कार्यकर्त्याच्या हृदयात कायम जिवंत राहील. महाराष्ट्राच्या विकासाच्या इतिहासात तुमचे योगदान सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.

तुमच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन!

माणूस जातो; पण त्याचे विचार, त्याचे कार्य आणि त्याने घडवलेला विकास कायम समाजाला प्रेरणा देत राहतो.



**कपिल पवार**
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस,
अहिल्यानगर